# उल्हासनगर महानगरपालिका,उल्हासनगर

जा.क्र. उमपा/आ.का./३५४/२०२१
दिनांक : ८ सप्टेंबर, २०२१

## : परिपत्रक :

**विषय: श्री गणेश मुर्ती संकलन केंद्रांबाबत मार्गदर्शक सूचना**

**संदर्भ: १. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७**
**२. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५**
**३. गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र. आरएलपी-०६३२/ प्र.क्र १४४/विशा-१ब, दिनांक २९/०६/२०२१**
**४. परिपत्रक क्रमांक उमपा/आ.का/३४४/२०२१, दिनांक १७ ऑगस्ट, २०२१**

१. दिनांक १०/०९/२०२१ पासून गणेशोत्सवास प्रारंभ होत असून या संदर्भात शासनाकडून प्राप्त झालेल्या सूचनांच्या अनुषंगाने गणेशोत्स्व साजरा करणेबाबत मार्गदर्शक सूचना संदर्भिय क्र. ४ अन्वये निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत.

२. या संदर्भात महापालिका प्रशासन, पोलिस प्रशासन व महापालिका पदाधिकारी तसेच गटनेते यांचे समवेत झालेल्या संयुक्त बैठकीत यावर्षी देखील गणेशमुर्ती संकलन केंद्र स्थापन करण्याचा निर्णय सर्वानमुते घेण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने कोरोना/कोव्हिड महामारीच्या काळामध्ये विसर्जन स्थळी भाविकांची होणारी गर्दी टाळण्यासाठी तसेच कोरोनाचा संसर्ग पसरु नये यासाठी महापालिकेतर्फे प्रभाग समितीनिहाय गणेश मुर्ती संकलन केंद्रे निर्माण करण्यात येत आहेत. सदरहु संकलन केंद्रांवर गणेश मूर्तीचा स्विकार करुन पालिकेच्या कर्मचा-यांमार्फत गणेशमुर्तीचे विधीवत विसर्जन करण्यात येईल. सदरहु संकलन केंद्रांचा सविस्तर तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | गणेश मुर्ती संकलन केंद्रांचे ठिकाण |
|---|---|
| | **प्रभाग समिती क्र. १** |
| १ | भगवंती नावानी स्टेज समोर, गोल मैदान, उल्हासनगर-४२१००१. |
| २ | साधु बेला शाळा, उल्हासनगर-४२१००१. |
| ३ | महापालिका शाळा क्रमांक १७, गवळी पाडा, सी.ब्लॉक, उल्हासनगर-४२१००३. |
| | **प्रभाग समिती क्र. २** |
| ४ | प्रभाग समिती क्र. २ कार्यालय, सपना गार्डन समोर,उल्हासनगर-४२१००२. |
| ५ | एस.ई.एस शाळा, खेमाणी, उल्हासनगर-४२१००२. |
| ६ | बोट क्लब, हिराघाट, उल्हासनगर-४२१००३. |
| | **प्रभाग समिती क्र. ३** |
| ७ | प्रभाग समिती क्र. ३ कार्यालय, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे क्रिडा संकूल, उल्हासनगर-४२१००४. |
| ८ | व्हिनस चौक, माणेरा रोड, उल्हासनगर-४२१००४. |
| ९ | गुरु गुलराज साहेब चौक, गुलराज टॉवरच्या समोर, उल्हासनगर-४२१००३. |
| | **प्रभाग समिती क्र. ४** |
| १० | प्रभाग समिती क्र. ४ कार्यालय, अग्निशमन कार्यालय इमारत, उल्हासनगर-४२१००५. |
| ११ | स्वामी शांतीप्रकाश हॉलच्या बाजुला, गुरुनानक शाळेजवळ, कुर्ला कॅम्प रोड, उल्हासनगर-४२१००४. |
| १२ | कैलास कॉलनी, उल्हासनगर-४२१००५. |

३. शक्यतो सर्व गणेशमुर्तींचे विसर्जन घरीच/मंडळाचे मंडपातच करण्यात यावे. घरात/मंडपातच लोखंडी टाकी ठेवून किंवा तत्सम व्यवस्था करुन मुर्तींचे विसर्जन करावे, असे शक्य नसल्यास विसर्जनाची पुजा अर्चा व आरती घरीच/मंडळाचे मंडपात करुन महापालिकेच्या गणेश मुर्ती संकलन केंद्रावर मुर्ती जमा कराव्यात. सदर मुर्तींचे महापालिकेमार्फत विधीवत विसर्जन करण्यात येईल.

४. सर्व प्रभाग अधिकारी यांनी या मार्गदर्शक सूचनांची प्रसिध्दी आपल्या प्रभाग समिती कार्यक्षेत्रात उद्घोषणेव्दारे करुन व्यापक प्रमाणात प्रसिध्दी करावी.

५. शासनाने, महानगरपालिका व पोलीस प्रशासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष सण सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत अजुन काही सूचना प्राप्त झाल्यास त्यांचे अनुपालन करणे बंधनकारक असेल.

६. वरील सर्व सूचनांचे पालन करुन उल्हासनगर महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

(डॉ.राजा दयानिधी भा.प्र.से.)
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत-

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
२. मा. पालकमंत्री तथा मंत्री नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
३. मा. मुख्य सचिव महोदयांचे विशेष कार्य अधिकारी.
४. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग.
५. मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
६. मा. पोलीस आयुक्त, ठाणे.
७. मा.महापौर, मा.उप महापौर, मा.सभापती स्थायी समिती, मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्षनेता, मा.सभापती प्रभाग समिती, सर्व गटनेता, सर्व सन्माननीय महापालिका सदस्य यांचेकडे माहितीसाठी.
८. मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती/आरोग्य परिक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती/महसूल समिती/पाणी पुरवठा व मलनिस्सारण समिती/सार्वजनिक बांधकाम समिती/नियोजन व विकास समिती/पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती/गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती/क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती.
९. सर्व मा.महापालिका सदस्य/सदस्या, उल्हासनगर महानगरपालिका.
१०. पोलिस उप आयुक्त, परिमंडळ - ४, उल्हासनगर.
११. सहाय्यक पोलिस आयुक्त, उल्हासनगर/अंबरनाथ.
१२. वरिष्ठ पोलिस निरिक्षक, उल्हासनगर/मध्यवर्ती/विठ्ठलवाडी/हिललाईन/शिवाजीनगर पोलिस स्टेशन.
१३. जनसंपर्क अधिकारी, उ.म.पा. यांनी सदर परिपत्रकाची उचित माध्यमांव्दारे जास्तीत जास्त प्रसिध्दी करावी. व प्रत्यक्ष सण सुरु होण्यापूर्वी ~~४~~ २ दिवस दररोज प्रेस नोट व्दारे सदरचे परिपत्रक उचित माध्यमांव्दारे प्रसिध्द् करावे.
१४. अतिरिक्त आयुक्त, सर्व उप आयुक्त. सर्व सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती कार्यालये.
१५. सर्व विभागप्रमुख.
१६. सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग यांजकडे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी.